सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १७२ | रविवार, दि. १५ मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com






**श्री. भोजमलदादा पाटील**
माजी सभापती, पं. स.



**श्री. अनिलनाना कदम**
माजी अध्यक्ष : खा. शि. मंडळ



**श्री. मनोज पाटील**
लोकमत



**श्री. चेतन ठाकूर**
पोस्ट विभाग



**श्री. गुणवंत वाघ**
प्रताप महाविद्यालय



**श्री. देविदास देसले**
सामाजिक कार्यकर्ता



**श्री. दीपक महाजन**
व्यापारी



**श्री. पुष्पक कोचर**
व्यापारी

# तुम्हाला निवडणुकीत तीन-तीन बाण दिले ना मतदारांनी...!

## आता पारदर्शकतेसाठी तुम्ही... एक बाण तर द्या ना राव...!!



### थेट प्रक्षेपण, पत्रकार प्रवेश सर्वांच्याच हिताचे...!

पत्रकारांना सभास्थानी सन्मानपूर्वक प्रवेश द्यावा अशी मागणी विरोधात असलेल्या शहर विकास आघाडीनेच केली आहे, हे विशेष! तसेच पहिल्या सभेचे संपूर्ण शुटिंगही शविआने मागितले आहे. मात्र, या दोन्ही मागण्या सत्ताधारी का मान्य करत नाहीत? त्यांना नेमकी कसली भीती आहे ? याबाबत उलटसुलट चर्चा होत राहतात. शविआच्या मागणीप्रमाणे सभेचे थेट प्रक्षेपण झाले असते, शुटिंगचे रेकॉर्ड मिळाले असते, पत्रकारांना सभेत प्रवेश मिळाला असता तर उपनगराध्यक्ष प्रशांत निकम दोषी कि निर्दोष? हा प्रश्नच उद्भवला नसता. भविष्यात अशा प्रसंगांची पुर्नरावृत्ती होऊ नये, यासाठी सत्ताधाऱ्यांनी किमान या बाबतीत तरी शविआच्या विनंती मान देवून थेट प्रक्षेपण व पत्रकार प्रवेशाचा ऐतिहासिक निर्णय घ्यायला हरकत नाही. त्यामुळे भविष्यात कोणत्याही पक्षाच्या, गट- तटचा नगरसेवक, नगराध्यक्ष, मुख्याधिकारी किंवा कोणताही कर्मचारी गैरसमजाचा बळी ठरणार नाही.



ग्लोबल महातेज


24 Feb 2026 - Page 1

पालिकेतील सर्व सभांचे लाईव्ह प्रक्षेपण व्हावे

नगरसेवकांची नगराध्यक्ष, मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील पालिकेची सभा मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी होत आहे. या पार्श्वभूमीवर पालिकेच्या सर्व सभांच्या कामकाजाचे व्हिडिओ शूटिंग व्हावे, बाहेर कर्मचारी व नागरिकांसाठी स्क्रीन लावला जावा, केबल टीव्हीच्या माध्यमातून थेट प्रक्षेपण व्हावे व पत्रकारांना सभागृहात स्थान मिळावे, अशी मागणी नगरसेवक- नगरसेविकांनी निवेदनाद्वारे केली आहे. सदर निवेदन नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर व मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी निवेदन देण्यात आले आहे.



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पालिकेच्या निवडणुकीच्या काळात विजयासाठी तीन- तीन बाण सोडण्याची मागणी वजा विनंती शिवसेनेतर्फे करण्यात आली होती. शिवसेनेच्या विनंतीला मान देवून मतदारांनी मोठ्या प्रमाणात मतदानरुपी बाण सोडून त्यांना सत्तास्थानी बसविले आहे. आता सत्तेत पारदर्शकता आणण्यासाठी आणि खऱ्या- खोट्याचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी त्यांच्या विविध सभांचे थेट प्रक्षेपण व पत्रकारांना प्रवेशाचा एक बाण तरी सोडावाच, अशी व्यापक अपेक्षा केली जात आहे. अन्यथा उपनगराध्यक्ष प्रशांत निकम यांच्याविरूद्ध आलेल्या प्रक्षोभक मोर्चासारखे दूर्दैवी व कटू प्रसंग घडतच राहतील.

सर्वसाधारणपणे ज्यांची सत्ता येते त्यांच्या हातून सत्तेचा दुरुपयोग होणे, बेकायदेशीर कामे व देयके अदा होणे, मनमानी, दादागिरी अशा गोष्टी ओघानेच येतात. अर्थात काही दावे यासाठी सन्माननिय अपवादही आहेत. तसेच विरोधकही अनेकदा विरोधाला विरोध करतात. सत्ताधाऱ्यांना कैचित पकडण्याचे एकही संधी सोडत नाहीत. कधीकधी 'बात का बतंगड' अशी स्थितीही निर्माण करतात. टिकली फुटली तरी बॉम्ब फुटला असे सांगतात. अर्थात हे चूक की बरोबर ? याचे उत्तर कायमस्वरूपी अनुत्तरीतच राहणार आहे. कारण कूटनिती तज्ज्ञांनीच प्रेम, युद्ध आणि राजकारणात सारे काही क्षम्य असल्याचे म्हटले आहे. मात्र, प्रगती विज्ञानाने यावर सर्वोत्कृष्ट पारदशी तोडगा काढला आहे. तो म्हणजे थेट प्रक्षेपण आणि लोकप्रतिनिधींच्या संस्थास्तरीय सभांचे थेट प्रक्षेपय होय. त्याचे सुपरिणाम आपण विधानसभा, विधान परिषद, लोकसभा, राज्यसभा व विविध महापालिकांमध्ये पाहावयास मिळतात. थेट प्रक्षेपणामुळे मी असे बोललोच नाही, अशी सावरासावरी कोणालाही करता येत नाही. तसेच कुणाला ध चा मा ही करता येत नाही. सत्ताधारी आणि विरोधक या दोघांसाठी थेट प्रक्षेपण पारदर्शकतेसाठी अत्यावश्यकच आहे. त्याचप्रमाणे पत्रकारांना सभास्थानी प्रवेश मिळाल्यास ऐकिव माहितीवर विश्वास न ठेवता सभांचे थेट वृत्तांकन करणे त्यांना शक्य होते. त्यामुळे लोकांनाही सत्यस्थिती कळते.

येथील पालिकेच्या सभांचे थेट प्रक्षेपण व्हावे, बाहेर सभा सुरू असताना बाहेरही स्क्रिन लावावेत.

सध्या येथील पालिकेत सत्ताधारी मंडळी चार भिंतींच्या आड सभा घेतात. मात्र, सभागृहात पत्रकारांना प्रवेश न देता बाहेरच पत्रकार परिषद घेऊन आरोप- प्रत्यारोपांची चिखलफेक केली जाते, अशी टिका होत आहे. त्यामुळे सभागृहात नेमके काय घडले ? कोणत्या विषयावर काय चर्चा झाली ? कोणते निर्णय झाले ? याबाबत नागरिकांसह पत्रकारांनाही अचूक माहिती मिळत नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे. येथील पालिकेत सभेच्यावेळी अजूनही पत्रकारांना तासंतास सभागृहाच्या बाहेर उभे राहण्याची वेळ येत असल्याने पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. तीन- तीन बाण सोडणार असा नारा देणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी आता किमान पारदर्शकतेचा एक तरी बाण वापरून सभांचे थेट प्रक्षेपण सुरू करावे आणि पत्रकारांना सभेत प्रवेश द्यावा, अशी मागणी नागरिक व जाणकारांकडून होत आहे. लोकशाहीत निर्णय प्रक्रिया खुली आणि पारदर्शक असणे गरजेचे असते. त्यामुळे पालिकेनेही देशातील इतर लोकशाही संस्थांप्रमाणे सभांचे लाईव्ह प्रक्षेपण सुरू करून पत्रकारांना मुक्त प्रवेश दिला तर अनेक गैरसमज आपोआप दूर होतील, असे मत राजकीय व सामाजिक वर्तुळात व्यक्त होत आहे. ▲

# राज्यात चार दिवस पावसाची शक्यता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यातील काही भागांमध्ये १७ ते २० मार्च दरम्यान वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे. प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, खानदेशसह मध्य महाराष्ट्रातील काही भागात पावसाचा अंदाज आहे. काही ठिकाणी गारपीट होण्याचीही शक्यता आहे.

रब्बी हंगामातील पिकांची काढणी सुरू आहे. शेतकऱ्यांनी काढलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत अथवा झाकून ठेवावीत. हवामानाच्या अद्ययावत अंदाजावर लक्ष ठेवून शेतीची कामे नियोजित करावीत आणि संभाव्य पाऊस व वादळी वाऱ्यांपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे कृषी विभागाकडून आवाहन करण्यात आले आहे. ▲

# डंपरने चिरडल्याने तरुणाचा मृत्यू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



*अमळनेर : डंपरने तरुणास चिरडल्यानंतर जमलेला संतप्त जमाव.*

अमळनेर : भरधाव डंपरने चिरडल्याने तरुणाचा मृत्यू झाला आहे. ही घटना शुक्रवार, दि. १३ मार्च रोजी सायंकाळी फरशी रोडवर घडली. घनश्याम तुकाराम पाटील (वय ३५, रा. बोरसे गल्ली) असे तरूणाचे नाव आहे. घटनेनंतर नागरिकांचा मोठा जमाव झाला होता. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन जमावास शांत केले. घनश्याम पाटील याचा केटरिंगचा व्यवसाय होता. गॅसचा तुटवडा असल्याने लाकडाची व्यवस्था करण्यासाठी तो सिद्धीविनायक मंगल कार्यालयात जात असताना ही घटना घडली. या घटनेमुळे परिसरात हळळळ व्यक्त होत आहे.

दरम्यान, शहरात सर्रासपणे अवैध वाळू वाहतूक सुरू आहे. अवजड वाहनांचे प्रमाण वाढले आहे. परिणामी रस्त्यांची अवस्थाही दयनीय होत आहे. दरम्यान, महिनाभरापूर्वी शनिपेठ परिसरात एका डंपरने मोटारसायकलस्वार तरुणास चिरडल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर संतप्त नागरिक व महिलांनी सुमारे एक तास रास्ता रोको आंदोलन केले होते. पोलिसांनी समजूत घातल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले होते. सतत घडणाऱ्या या घटनांमुळे शहरातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. वाहतूक शाखा, महसूल विभाग आणि पोलीस प्रशासनाने बेफाम डंपर चालकांवर कठोर कारवाईची मागणी होत आहे. ▲

# भुकरमापक अधिकारीपदी वैष्णवी सूर्यवंशीची निवड

## नवलभाऊ शैक्षणिक परिवारातर्फे विशेष सत्कार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



*नवलनगर : वैष्णवी सूर्यवंशीचा सत्कार करताना प्रा. सुनील गरुड. शेजारी डी. बी. पाटील, डी. के. पवार, प्रा. श्याम पवार, प्रेमराज सूर्यवंशी आदी.*

अमळनेर : येथील विजयनाना पाटील आर्मी स्कूल आणि कनिश्ठ महाविद्यालयाचे वरिष्ठ लिपिक प्रेमराज सूर्यवंशी यांची सुकन्या कु. वैष्णवी प्रेमराज सूर्यवंशी हिची नुकतीच महाराष्ट्र शासनाच्या भूमी अभिलेख नाशिक विभागात भू करमापक अधिकारी म्हणून निवड झाली आहे. या पार्श्वभूमीवर कु. वैष्णवी व तिच्या पालकांचे नवलभाऊ शैक्षणिक परिवारातर्फे शुक्रवार, दि. १३ मार्च रोजी विशेष सत्कार करण्यात आला.

कु.वैष्णवी सूर्यवंशी हिने सरळ सेवा परीक्षेमध्ये अभ्यास करून अधिकारी पदावर गगनभरारी घेतली आहे. सामान्य कुटुंबातील या विद्यार्थिनीने दूर्दम्य इच्छाशक्ती व आत्मविश्वासच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. नवलभाऊ प्रतिष्ठानचे मानद शिक्षण संचालक प्रा. सुनील गरुड, नवलभाऊ प्रतिष्ठानचे प्रशासकीय अधिकारी प्रा. शाम पवार, नवलभाऊ प्रतिष्ठानचे प्रशासकीय अधिकारी डी. बी. पाटील, निवृत्त प्राचार्य डि.के पवार सर, राज्य सैनिकी शाळा असोसिएशनचे कार्यकारी सदस्य उमेश काटे, प्रा. डॉ. हुकूमचंद जाधव आदी प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत कु. वैष्णवी हिचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय उभाळे अध्यक्षस्थानी होते. या कार्यक्रमाला प्रा. डॉ. यू. वाय. गांगुर्डे, प्रा. डॉ. एन. झेड. पाटील, डॉ. एस. जे. पाटील, प्रा. डॉ. के. डी. बागूल, प्रा. शिवाजी सूर्यवंशी, प्रा. विजय शिंदे, प्रा. सुजाता निकम, प्रा. छाया पाटील यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते. दरम्यान, कु. वैष्णवी हिच्या यशाबद्दल संस्थाध्यक्ष तथा माजी केंद्रीय मंत्री विजय नवल पाटील, संस्थेच्या प्रमुख मार्गदर्शिका शिलाताई पाटील, कार्याध्यक्ष अनिकेत पाटील, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रियदर्शनी पाटील, प्रशासकीय अधिकारी एल. डी. पाटील, प्रशासकीय अधिकारी बी. टी. पाटील आदींनी अभिनंदन केले आहे. ▲



## संपादकीय

# जाणीव निर्माण करणाऱ्या युद्धझळा

युद्ध जरी आखाती देशांत सुरू असले, तरी भारतावर त्याचे अनेक परिणाम दिसू लागले आहेत. प्रामुख्याने इंधन पुरवठ्यावर सर्वाधिक परिणाम झाला असल्याने संपूर्ण देशात मोठी इंधन टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. किंबहुना तशी सुरूवात झालेली आहे. तो धोका लक्षात घेऊनच केंद्र सरकारने अत्यावश्यक सेवा, देखभाल कायदा म्हणजेच 'एस्मा' लागू केलेला आहे. केंद्र सरकार कितीही म्हणत असले, की आपल्याकडे साठा पुरेसा आहे. परंतु युद्धाचा भरवसा नसल्याने खबरदारीच्या उपाययोजना तितक्याच गरजेच्या ठरतात. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्ध लवकरच संपेल, असे वक्तव्य केले आणि त्याच दिवशी अमेरिकेने इराणच्या मोठ्या जहाजावर हल्ला केला. शिवाय इराण आणि इस्त्रायल यांनीही एकमेकांवर जोरदार क्षेपणास्त्र हल्ले केले. सध्या कोणीही माघार घेण्याच्या मनःस्थितीत नाही. इराणने युद्धामध्ये केलेली खेळी ही त्या देशाला त्रासदायक जरी ठरणारी असली, तरी जगाला वेठीस धरणारी म्हणावी लागेल. अमेरिकेला पाठिंबा देणाऱ्या जवळपास दहा आखाती देशांना इराणने टार्गेट केलेले आहे. सौदी अरेबिया, कतार, बहारिन यासारख्या देशांवरही इराणकडून हल्ले झाले. विशेषतः या देशांचे तेलसाठे उद्ध्वस्त करण्याचा इराणकडून प्रयत्न झाला. यामागचा हेतू स्पष्ट आहे, की युद्ध जरी इराण आणि अमेरिका यांच्यातील असले, तरी अमेरिकेच्या बाजूने उभ्या राहणाऱ्या देशांना त्याचे मोठे परिणाम सहन करावे लागतील आणि आता ती परिस्थिती निर्माण झालेली आहे. भारताला जवळपास अन्य दहाच्या दहा आखाती देशांतून मोठा इंधन पुरवठा होतो. शिवाय रशियाकडूनही कच्चे तेल उपलब्ध होते. परंतु प्रामुख्याने स्वयंपाकाच्या गॅसचा पुरवठा हा सौदी अरेबिया आणि कतार यासारख्या देशांतून होतो. सतत होणाऱ्या हल्ल्यांमुळे या देशांनी बऱ्याच ठिकाणचे गॅस उत्पादन थांबविले आहे. स्वाभाविकपणे भारताला मिळणाऱ्या स्वयंपाकाच्या गॅस पुरवठ्यावर मोठा परिणाम दिसू लागला.

देशभरातील जवळपास सगळ्या मोठ्या शहरामंधील इतर व्यावसायिकांच्या गॅस पुरवठ्यात कपात केलेली आहे. यामागे घरगुती गॅसच्या पुरवठ्यात मोठी अडचण येऊ नये असाच प्रयत्न आहे. सरकारकडून घरगुती गॅस पुरेशा प्रमाणात असल्याचे सांगितले जाते. जरी या परिस्थितीचा गैरफायदा उठवण्याचा प्रयत्न काही गॅस एजन्सीजकडून सुरू आहे. अगदी महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी सिलिंडर मिळविण्यासाठी एजन्सीजच्या बाहेर लांबच लांब रांगा लागत आहेत. त्यामागे टंचाई होण्याची भीतीच दिसून येते. पुढच्या काळात ज्यांच्याकडे दोन सिलिंडर असतील त्यांना काही काळासाठी एकाच सिलिंडरवर भागवावे लागू शकते. थोडक्यात सरकारने स्वयंपाकाच्या गॅसची टंचाई लक्षात घेऊन सिलिंडरचे रेशनिंग सुरू केल्याचे दिसून येते. भारतीय कंपन्यांकडून गॅस सिलिंडरचे उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न होतो आहे. परंतु संपूर्ण देशाला पुरवू शकतील एवढी उत्पादन क्षमता त्यांच्याकडे नाही. युद्धाच्या या कठीण प्रसंगातही ज्या देशांबरोबर भारताचे संबंध चांगले आहेत त्यांच्याकडून हा पुरवठा अधिकाधिक सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न होतो आहे. मधल्या काळामध्ये घरगुती गॅसचे दर जवळपास ५५ रुपयांनी वाढले आहेत. या किमतीदेखील नियंत्रणात ठेवण्याची कसोटी सरकारला पार पाडावी लागेल. विशेष म्हणजे किमती वाढण्याचीही शक्यता लक्षात घेऊन लोकांवरदेखील गॅसचा वापर मर्यादित करण्याची वेळ आलेली आहे. या युद्धाचे परिणाम इतक्या तीव्रतेने आणि अशा पद्धतीने भारताला सहन करावे लागतील. याची पुरेशी कल्पना आलेली नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे भारताचे ज्या आखाती देशाशी संबंध चांगले आहेत. त्या देशांमध्येही इराणने हल्ले केल्याने भारताची मोठी अडचण झाली. कच्चे तेल असो किंवा स्वयंपाकाचा गॅस असो, याचा बराच साठा भारताला लागत असतो.

कच्च्या तेलाच्याबाबतीत ही निर्यात कमी करण्याचा प्रयत्न सरकारकडून सुरू आहे. मग अगदी इथेनॉलच्या वापरापासून ते इलेक्ट्रीक किंवा नैसर्गिक वायूवरच्या वाहनांच्या मोठ्या उत्पादनापर्यंत हे प्रयत्न दिसून येतात. परंतु आता युद्धाच्या काळामध्ये म्हणजे ऐनवेळी होणाऱ्या अशा कोणत्याही प्रसंगात हे प्रयत्नदेखील अपुरे ठरतात. या सगळ्या युद्धाचा प्रामुख्याने इंधन पुरवठ्यावर परिणाम होत असल्याने भारतातल्या दैनंदिन जीवनावर त्याचा प्रभाव पडतो आहे. विशेषतः स्वयंपाकाचा गॅस काही प्रमाणात कच्चे तेल आणि अनेक देशांमधील अस्थिर परिस्थिती याचा अर्थकारणावर परिणाम होतो. येणारी लग्नसराई या इंधन कचाट्यात सापडली आहे. देशातील अनेक शहरामध्ये युद्धामुळे लग्नाचे मुहूर्त पुढे ढकलावे लागत आहेत. ज्या लग्नसराईच्या हंगामातून काही लाख कोटींची उलाढाल होते. परंतु या इंधन धोक्याने या उलाढालीवरही मोठे सावट आलेले आहे. मोठ्या हॉटेल व्यावसायिकांचे धाबे तर दणाणले आहेच. कारण आपल्या ग्राहकांना आपण योग्य पद्धतीची सेवा देऊ शकणार नाही हे लक्षात घेऊन मोठमोठ्या पंचतारांकित हॉटेल्सने बुकिंग बंद केलेले आहे. अतिशय मर्यादित प्रमाणात व्यवसाय करण्याची वेळ येऊ लागली आहे. घरगुती स्तरावर येणारा गॅसचा तुटवडा लक्षात घेऊन इलेक्ट्रीक आधारित साधनांच्या खरेदीही वाढ लागल्याचे चित्र आहे. इंडक्शन यासारख्या प्रकारांची मागणी वाढल्याची बाजारात परिस्थिती आहे. हवाई वाहतुकही चांगलीच अडचणीत सापडलेली दिसून येते. विशेषतः आखाती देशांमधील उड्डाणे तर बंद आहेतच. परंतु युरोपिय देशांना जाणाऱ्या अनेकांनी आपले बेत रद्द केले. परदेशी पर्यटनाला चांगलाच तडाखा बसलेला आहे. म्हणूनच ऐन उन्हाळ्यामध्ये सुरू झालेल्या युद्धाच्या झळा चांगलेच चटके देणाऱ्या ठरत आहेत. परिस्थिती लवकर सुधारावी त्यासाठी जरी प्रयत्न होत असले तरी काळजीपूर्वकच परिस्थिती हाताळणे गरजेचे ठरते.




अमळनेर : छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीरात विविध दाखले वितरण करताना तहसीलदार रुपेशकुमार सुराणा व मान्यवर. दुसऱ्या छायाचित्रात शिबिरात उपस्थित शेतकरी व ग्रामस्थ.

# गडखांब येथे समाधान शिबीर उत्साहात

## विविध शासकीय सेवांचा शेतकरी, ग्रामस्थांना थेट लाभ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील गडखांब येथे शनिवार, दि. १४ मार्च रोजी छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर उत्साहात झाले. या शिबिराचे उद्घाटन तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरामध्ये नागरिकांना विविध शासकीय सेवांचा थेट लाभ देण्यात आला. यावेळी विविध प्रशासकीय विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी, तालुकास्तरीय शासकीय अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुरवठा शाखेमार्फत १३७ नवीन व दुबार शिधापत्रिका वितरित करण्यात आल्या. संगायो शाखेत ९९ लाभार्थ्यांची डीबीटी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. २३५ हयात प्रमाणपत्रे तर ४२ नवीन अर्ज स्वीकारण्यात आले. महसूल विभागाकडून सातबारा दुरुस्तीचे ३१ प्रकरणे, २२ फेरफार नोंदी, ७२० सातबारा उतारे आणि इतर ४१० उतारे वितरित करण्यात आले. सेतू शाखेमार्फत ३१८ उत्पन्न दाखले, १३५ रहिवासी दाखले, ४९ जातीचे दाखले तसेच १३ नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्रे नागरिकांना देण्यात आले. शिबिराच्या ठिकाणी विविध प्रशासकीय विभागांचे माहितीपर प्रदर्शन लावण्यात आले होते. नागरिकांना शासकीय योजनांची माहिती तसेच तातडीच्या सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. या शिबिराला सुमारे ९०० जणांची उपस्थिती लाभली. तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांनी मार्गदर्शन केले. निवासी नायब तहसीलदार सी. यू. पाटील यांनी आभार मानले.




अमळनेर : संगणक प्रशिक्षणाच्या समारोपानंतर प्रमाणपत्र वितरणप्रसंगी उपस्थित महिला.

# उमेद अभियानांतर्गत महिलांना संगणक प्रशिक्षण

## आधार संस्थेचा उपक्रम; सुमारे ३५ महिलांनी घेतला लाभ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आधार बहुउद्देशीय संस्थेतर्फे स्वामिनी प्रकल्पांतर्गत उमेद अभियानातील समुदाय साधन व्यक्ती (सीआरपी) महिलांसाठी नुकतेच मोफत बेसिक संगणक प्रशिक्षण घेण्यात आले. महिलांना कामाचा भाग म्हणून सतत माहिती पाठवणे, विविध प्रकारचे रिपोर्ट तयार करणे हे काम मायक्रोसॉफ्ट वर्ड आणि एक्सेल मधून करावे लागते. या पार्श्वभूमीवर महिलांनाही संगणकाचे ज्ञान व्हावे, या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला. सुमारे १२ दिवसीय बेसिक संगणक प्रशिक्षण वर्ग आयोजीत करण्यात आले होते. एकूण ३५ महिलांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

प्रशिक्षणादरम्यान महिलांना एम. एस. वर्ड, एम. एस. ऑफिस, पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन तसेच विविध प्रकारच्या आधुनिक एआय टूल्सबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. प्रात्यक्षिक स्वरूपात संगणकावर सराव करण्याची संधीही देण्यात आली. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर सहभागी महिलांना प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी पुढील मार्गदर्शनही करण्यात येणार आहे.

प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी आधार संस्थेच्या अध्यक्षा डॉ. भारती पाटील तसेच कार्यकारी संचालिका श्रीमती रेणू प्रसाद उपस्थित होत्या. उमेद अभियानाच्या तालुका अभियान व्यवस्थापिका सीमा रगडे व तालुका व्यवस्थापक ज्योती भावसार उपस्थित होत्या. डॉ. भारती पाटील यांनी महिलांना आर्थिक स्वावलंबन व उद्योजकतेविषयी मार्गदर्शन केले. यावेळी सीमा रगडे यांनी उमेद अभियानाच्या माध्यमातून महिलांना या प्रशिक्षणाचा मोठा फायदा होणार असल्याचे सांगितले.

प्रशिक्षक तुषार चौधरी आणि सुमित पाटील यांनी प्रशिक्षण दिले. प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर मुरलीधर बिरारी यांनी सूत्रसंचालन केले. अश्विनी सूर्यवंशी व उर्जिता शिसोदे यांनी सहकार्य केले.



# समुहाने रहाणारा सातभाई

**पक्ष्यांची ओळख**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**नाव :** सातभाई Babbler
**रंग :** राखाडी,फिकट तपकिरी
**चोच :** पिवळ्या रंगाची
**डोळे :** बुबूळ पिवळे,मध्यभागी काळा ठिपका
**शेपूट :** शरीराच्या तुलनेत शेपूट लांब व जाड असते. उडतांना फुलते. अन्न शोधतांना तोल राखण्यासाठी उपयुक्त ठरते.
**अन्न :** जमिनीवरील किडे,अळ्या व लहान फळे
**अंडी :** मादी एप्रील मे मध्ये दोन तीन अंडी देते. अंड्यांचा रंग फिकट निळा. नर व मादी अंडी उबवितात व पिल्लांचे संगोपन करतात.
**घरटे :** भारद्वाज दाट काटेरी झुडुपात फेब्रुवारी महिन्यात घरटे बांधतो
**वैशिष्ट्ये :** सातभाई दहा बारा संख्येने एकत्र राहतात. रॅ रॅ रॅ असा आवाज काढत उडतात. फार लांब उडण्याची क्षमता नाही.सामाजिक जीवन जगतात. समूहाने राहतात.

**संग्राहक : प्रा. प्रकाश धर्माधिकारी**
**निसर्ग मित्र मंडळ,अमळनेर**

# साने गुरुजी विद्यालयातील विद्यार्थ्यांना खाऊवाटप



## शिक्षक विलास पाटील यांचे दातृत्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील साने गुरुजी विद्यालयातील शिक्षक विलास रतन चौधरी हे मार्च महिन्यात निवृत्त होत आहेत. तत्पूर्वी त्यांनी वाढदिवशी विद्यार्थ्यांना लाडू वाटप केले. ३५ वर्ष ज्या शाळेत ज्ञानदानाचे कार्य केले त्यासाठी काही तरी करावे या भावनेतून त्यांनी विद्यार्थ्यांचे तोंड गोड केले.

संस्थेचे सचिव संदीप घोरपडे अध्यक्षस्थानी होते. संस्थेचे अध्यक्ष हेमकांत पाटील, माजी अध्यक्ष गुणवंतराव पाटील, संचालक मगन वामन पाटील, मुख्याध्यापक सुनील पाटील आदी प्रमुख पाहुणे होते. यावेळी श्री. चौधरी यांचा सत्कारही करण्यात आला. श्री. चौधरी यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले, की (स्व.) माजी आमदार गुलाबराव पाटील यांनी मला सेवेची संधी दिली. त्यांचे दातृत्व आजही माझ्या डोळ्यासमोर आहे. डोळ्यासमोर त्यांचा आदर्श ठेवत लेकरांचे तोंड गोड करावे असा माझा मानस होता. संदीप घोरपडे यांनी सांगितले, की विलास चौधरी यांनी प्रामाणिक आणि सचोटीने आपले कर्तव्य केले. याचा मन्सवी आनंद आहे. आगामी काळात त्यांच्यावर मोठी जबाबदारी देण्याची इच्छा असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्याध्यापक सुनील पाटील यांनी सांगितले की, चौधरी सरांना कोणतेही काम दिले असेल तर ते काम शंभर टक्के होण्याची हमी होती. एक चांगला सहकारी आपल्यातून निवृत्त होईल याची खंत सदैव मनाला पोहोचत राहील. मनीष उघडे यांनी प्रास्ताविक केले. डी. ए. धनगर यांनी सूत्रसंचालन केले. समाधान पाटील यांनी आभार मानले.

# एकशे पाच वर्षे जुना ट्रॅक्टर, मुले भंगार समजून त्यावर खेळायची

## मालक रातोरात झाला कोट्यधीश!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जालंधरमध्ये भंगार समजलेला १०५ वर्ष जुना जर्मन 'लांझ बुलडॉग एचएल-१२' ट्रॅक्टर १. २५ कोटी रुपयांना विकला गेला आहे. हा ट्रॅक्टर १९२१ मध्ये जर्मनीच्या मॅनहाइम येथे हेनरिक लांझ कंपनीने बनवला होता. अमेरिकेतील एका खरेदीदाराने तो विकत घेतला आहे. आता हा ट्रॅक्टर कॅलिफोर्नियातील एका प्रसिद्ध कृषी संग्रहालयात प्रदर्शनासाठी जाणार आहे. लोकांना भंगार वाटणारी ही वस्तू आज जगभर चर्चेचा विषय बनली आहे. व्हायरल व्हिडिओमुळे ही बातमी सर्वत्र पसरली.

### ट्रॅक्टरचे वैशिष्ट्य काय?

हा ट्रॅक्टर १२ हॉर्सपॉवरचा सिंगल सिलिंडर 'हॉट बल्ब इंजिन'चा असून तो सुरू करण्यासाठी इंजिन गरम करावे लागते. कमी वेगातही खूप काम करतो. शेत नांगरणे, पाणी पंप करणे, गिरणी चालवणे असे अनेक कामे तो करायचा. १९२१ ते १९५० पर्यंत बनविलेल्या या मालिकेतील ट्रॅक्टर जगात खूप दुर्मीळ आणि मौल्यवान आहेत. जर्मन शेती तंत्रज्ञानाचे प्रतीक मानले जातात. मूळतः ब्रिटिशांकडे असलेला हा ट्रॅक्टर नंतर पंजाबच्या एका शेतकऱ्याकडे आला.

शहीद भगत सिंह चौकाजवळील एका जुन्या इमारतीत दशकानुदशके हा ट्रॅक्टर गंजलेल्या अवस्थेत पडला होता. लोक त्याला भंगार समजायची, मुले त्यावर खेळायची. त्याचा मालक ४० वर्षांपूर्वी अमेरिकेत स्थायिक झाला होता. त्यामुळे येथे कोणीही त्याची किंमत ओळखली नाही. स्थानिक लोकांसाठी तो ट्रॅक्टर म्हणजे फक्त जुनी वस्तू होती. मात्र, ट्रॅक्टर प्रेमींसाठी तो खजिना होता!





हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



जागतिक ग्राहक दिन विशेष

# ग्राहक हक्कांची जाणीव आणि संरक्षणाचा संदेश



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

दरवर्षी १५ मार्च हा दिवस संपूर्ण जगभर जागतिक ग्राहक दिन म्हणून साजरा केला जातो. ग्राहक हा कोणत्याही अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू असतो. बाजारपेठेत उत्पादने आणि सेवा यांचा वापर करणारा प्रत्येक नागरिक हा ग्राहक असतो. त्यामुळे ग्राहकांचे हक्क, सुरक्षितता आणि हितसंरक्षण याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी हा दिवस अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.




## जागतिक ग्राहक दिनाचा इतिहास

जागतिक ग्राहक दिन साजरा करण्यामागे एक ऐतिहासिक घटना आहे. १५ मार्च १९६२ रोजी अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांनी अमेरिकन काँग्रेसमध्ये ग्राहकांच्या हक्कांबाबत महत्त्वपूर्ण भाषण केले. या भाषणामध्ये त्यांनी ग्राहकांचे चार मूलभूत हक्क मांडलेसुरक्षिततेचा हक्क, माहिती मिळण्याचा हक्क, निवडीचा हक्क आणि ऐकले जाण्याचा हक्क. या भाषणानंतर ग्राहक चळवळीला जागतिक पातळीवर मोठी चालना मिळाली. त्यानंतर १९८३ पासून १५ मार्च हा दिवस अधिकृतपणे 'जागतिक ग्राहक दिन' म्हणून साजरा केला जाऊ लागला.

## ग्राहकांचे मूलभूत हक्क

ग्राहकांच्या संरक्षणासाठी विविध देशांमध्ये कायदे करण्यात आले आहेत. भारतातही ग्राहक संरक्षणासाठी मजबूत कायदेशीर व्यवस्था आहे. ग्राहकांचे काही महत्त्वाचे हक्क पुढीलप्रमाणे आहेत–

१) **सुरक्षिततेचा हक्क :** ग्राहकांनी खरेदी केलेली वस्तू किंवा सेवा त्यांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेसाठी धोकादायक नसावी.

२) **माहिती मिळण्याचा हक्क :** उत्पादनाची किंमत, गुणवत्ता, उत्पादन तारीख, कालबाह्यता तारीख, घटक इत्यादी माहिती ग्राहकांना स्पष्टपणे मिळणे आवश्यक आहे.

३) **निवडीचा हक्क :** ग्राहकांना विविध पर्यायांमधून आपल्या गरजेनुसार योग्य उत्पादन किंवा सेवा निवडण्याचा अधिकार आहे.

४) **ऐकले जाण्याचा हक्क :** ग्राहकांच्या तक्रारी आणि समस्यांकडे योग्य संस्थांनी लक्ष देणे आवश्यक आहे.

५) **तक्रार निवारणाचा हक्क :** ग्राहकांना अन्याय झाल्यास न्याय मिळवण्यासाठी ग्राहक न्यायालयात तक्रार करण्याचा अधिकार आहे.

६) **ग्राहक शिक्षणाचा हक्क :** ग्राहकांनी आपल्या हक्कांविषयी माहिती ठेवणे आणि जागरूक राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

## भारतातील ग्राहक संरक्षण व्यवस्था

भारतात ग्राहकांच्या हितासाठी ग्राहक संरक्षण कायदा २०१९ लागू करण्यात आला आहे. या कायद्यामुळे ग्राहकांना फसवणूक, चुकीची जाहिरात, निकृष्ट दर्जाची उत्पादने किंवा सेवांबाबत तक्रार करण्याची सुलभ व्यवस्था उपलब्ध झाली आहे. जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर ग्राहक आयोग स्थापन करण्यात आले आहेत. तसेच ऑनलाईन तक्रार नोंदविण्याची सुविधाही उपलब्ध आहे.

## डिजिटल युगातील ग्राहकांचे आव्हान

आजच्या डिजिटल युगात ऑनलाईन खरेदी आणि डिजिटल व्यवहार वाढले आहेत. त्यामुळे ग्राहकांना काही नवीन आव्हानांनाही सामोरे जावे लागते.

- ऑनलाईन फसवणूक
- बनावट वेबसाइट्स
- चुकीची किंवा भ्रामक जाहिरात
- निकृष्ट दर्जाची उत्पादने

यामुळे ग्राहकांनी खरेदी करताना अधिक सतर्क राहणे आवश्यक आहे. विश्वासार्ह संकेतस्थळांवरूनच खरेदी करणे, बिल आणि व्यवहाराची नोंद ठेवणे, तसेच उत्पादनाची माहिती नीट तपासणे आवश्यक आहे.

## ग्राहकांची जबाबदारी

- ग्राहकांचे हक्क जितके महत्त्वाचे आहेत तितक्याच त्यांच्या काही जबाबदाऱ्याही आहेत.
- वस्तू खरेदी करताना बिल घेणे
- उत्पादनावरील माहिती वाचणे
- फसवणूक झाल्यास तक्रार करणे
- योग्य आणि जबाबदार ग्राहक बनणे
- जागरूक ग्राहक हा मजबूत आणि पारदर्शक बाजारपेठेचा पाया असतो.

जागतिक ग्राहक दिन हा ग्राहकांच्या हक्कांची जाणीव करून देणारा आणि त्यांचे संरक्षण करण्याचा संदेश देणारा महत्त्वाचा दिवस आहे. जागरूकता, माहिती आणि कायदेशीर ज्ञान यांच्या साहाय्याने ग्राहक आपले हक्क सुरक्षित ठेवू शकतात. 'जागरूक ग्राहक  सुरक्षित समाज' हा संदेश लक्षात ठेवून प्रत्येकाने आपल्या हक्कांबरोबरच जबाबदाऱ्याही पार पाडल्या, तर ग्राहक सशक्तीकरणाची संकल्पना अधिक बळकट होईल.

# बडौदा के महाराजा सयाजीराव गायकवाड

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारत के इतिहास में कुछ राजा केवल शासन करने के लिए नहीं जाने जाते, बल्कि अपने विचारों और साहस से एक नया युग रच देते हैं। बड़ौदा के महाराजा सयाजीराव गायकवाड़ भी ऐसे ही शासकों में गिने जाते हैं। वह केवल एक रियासत के राजा नहीं थे, बल्कि एक दूरदर्शी सुधारक, शिक्षा के समर्थक और अंग्रेजी शासन के सामने झुकने से इनकार करने वाले साहसी भारतीय थे। उनके शासनकाल में बड़ौदा राज्य केवल समृद्ध ही नहीं हुआ, बल्कि वह कई मामलों में ब्रिटिश भारत से भी आगे निकल गया। महाराजा सयाजीराव गायकवाड का जन्मदिन ११ मार्च को बडौदा और अन्य जगह मनाया गया।

उनका जीवन ऐसे निर्णयों और घटनाओं से भरा हुआ था जिन्होंने भारतीय समाज, राजनीति और शिक्षा को गहराई से प्रभावित किया। यह कहानी केवल एक राजा की नहीं, बल्कि उस विचार की है जिसने आधुनिक भारत के निर्माण में महत्वपूर्ण भूमिका निभाई।

## एक साधारण गांव से शुरू हुई असाधारण यात्रा

सयाजीराव गायकवाड़ का जन्म ११ मार्च १८६३ को महाराष्ट्र के नासिक जिले के कवलाना गांव में हुआ था। उनका असली नाम गोपालराव गायकवाड़ था। वह मराठा गायकवाड़ वंश की एक शाखा से संबंध रखते थे। उनका परिवार राजघराने से जुड़ा जरूर था, लेकिन किसी ने भी यह कल्पना नहीं की थी कि यह बालक एक दिन बड़ौदा की गद्दी पर बैठेगा। उनके पिता काशीराव गायकवाड़ थे और परिवार साधारण जीवन जीता था। बचपन में ही गोपालराव ने जीवन के संघर्ष और अनुशासन को करीब से देखा। शायद यही अनुभव आगे चलकर उनके व्यक्तित्व का सबसे बड़ा आधार बना।

## बड़ौदा की गद्दी खाली हुई और शुरू हुई खोज

१८७० में बड़ौदा के लोकप्रिय महाराजा खंडेराव गायकवाड़ का निधन हो गया। उनके बाद उनके भाई मल्हारराव गायकवाड़ ने सत्ता संभाली, लेकिन उनका शासन अत्याचार, भ्रष्टाचार और विलासिता से भरा हुआ था। मल्हारराव ने राज्य की संपत्ति को बर्बाद कर दिया। कहा जाता है कि उन्होंने सोने की तोपें बनवाईं और मोतियों से बना कालीन तैयार करवाया। लेकिन सबसे बड़ा विवाद तब हुआ जब उन पर ब्रिटिश रेजिडेंट रॉबर्ट फेयर को जहर देने की कोशिश का आरोप लगा। इस घटना के बाद ब्रिटिश सरकार ने १० अप्रैल १८७५ को मल्हारराव को गद्दी से हटा दिया और उन्हें निर्वासन में भेज दिया। अब बड़ौदा की गद्दी खाली थी और नए उत्तराधिकारी की तलाश शुरू हुई।

## ६०० किलोमीटर की यात्रा और एक निर्णायक उत्तर

महारानी जमनाबाई ने गायकवाड़ वंश की विभिन्न शाखाओं को बड़ौदा बुलाया। कवलाना गांव से काशीराव अपने तीन बेटोंआनंदराव, गोपालराव और संपतरावके साथ लगभग ६०० किलोमीटर पैदल चलकर बड़ौदा पहुंचे। जब तीनों भाइयों से पूछा गया कि वे बड़ौदा क्यों आए हैं, तो गोपालराव का जवाब बिल्कुल अलग था।

## उन्होंने बिना झिझक कहा 'मैं यहां राज करने आया हूं।'

उनकी यह आत्मविश्वास से भरी बात सबको प्रभावित कर गई। अंततः २७ मई १८७५ को महारानी जमनाबाई ने गोपालराव को गोद लिया और उन्हें नया नाम दिया गया सयाजीराव। १६ जून १८७५ को वह बड़ौदा की गद्दी पर बैठे। उस समय उनकी उम्र कम थी, इसलिए कुछ वर्षों तक राज्य का प्रशासन एक परिषद द्वारा चलाया गया।

## शिक्षा और सुधारों का नया युग

जब सयाजीराव ने पूरी सत्ता संभाली, तब उन्होंने अपने राज्य में बड़े बदलाव शुरू किए। उनका मानना था कि किसी भी समाज की असली ताकत उसकी शिक्षा और सामाजिक न्याय में होती है। १९०६ में उन्होंने बड़ौदा राज्य में अनिवार्य और मुफ्त प्राथमिक शिक्षा लागू कर दी। उस समय ब्रिटिश भारत में भी ऐसी व्यवस्था नहीं थी।

## उन्होंने कई सामाजिक सुधार भी किए

- बाल विवाह पर रोक लगाने की कोशिश
- तलाक संबंधी कानून बनाना
- अस्पृश्यता के खिलाफ कदम उठाना
- शिक्षा का व्यापक प्रसार
- संस्कृत और वैचारिक अध्ययन को बढ़ावा
- इन सुधारों ने बड़ौदा को भारत के सबसे प्रगतिशील राज्यों में बदल दिया।
- बैंक ऑफ बड़ौदा और आर्थिक विकास

सयाजीराव केवल सामाजिक सुधारक ही नहीं थे, बल्कि आर्थिक विकास के भी बड़े समर्थक थे। 1908 में उन्होंने बैंक ऑफ बड़ौदा की स्थापना की। आज यह बैंक भारत के सबसे बड़े और प्रतिष्ठित बैंकों में गिना जाता है और दुनिया के कई देशों में इसकी शाखाएं हैं। उनके शासनकाल में कपड़ा उद्योग का भी तेजी से विकास हुआ। उन्होंने रेल नेटवर्क का विस्तार कराया और बड़ौदा को व्यापारिक रूप से मजबूत बनाया।

## पुस्तकालयों और विश्वविद्यालयों की क्रांति

सयाजीराव को पुस्तकों से विशेष प्रेम था। उन्होंने बड़ौदा में एक विशाल पुस्तकालय की स्थापना की, जो आगे चलकर सेंट्रल लाइब्रेरी बना। इसके साथ ही गांव-गांव में पुस्तकालयों का जाल बिछाया गया। उन्होंने ग्रामीण छात्रों की शिक्षा के लिए विशेष फंड भी बनाया। आगे चलकर उनके सपने को पूरा करते हुए उनके वंशजों ने महाराजा सयाजीराव विश्वविद्यालय, वडोदरा की स्थापना की।

## कला और संगीत के महान संरक्षक

सयाजीराव के दरबार में कला और संस्कृति को विशेष स्थान मिला। प्रसिद्ध चित्रकार राजा रवि वर्मा लंबे समय तक उनके दरबार से जुड़े रहे। भारतीय शास्त्रीय संगीत के लिए उन्होंने १८८६ में गायन शाला की स्थापना करवाई। बाद में यही संस्था संगीत महाविद्यालय बनी। उनके दरबार में उस दौर के महान संगीतकार जैसे उस्ताद फैयाज खान, अब्दुल करीम खान और इनायत खान भी आते थे।

## वह राजा जिसने प्रतिभाओं को पहचान लिया

सयाजीराव की सबसे बड़ी विशेषता थी प्रतिभाओं को पहचानना। उन्होंने डॉ. भीमराव अंबेडकर की उच्च शिक्षा के लिए आर्थिक सहायता दी। आगे चलकर वही अंबेडकर भारतीय संविधान के निर्माता बने। उन्होंने समाज सुधारक विठ्ठल रामजी शिंदे का समर्थन किया और दादाभाई नौरोजी जैसे महान नेता को अपने राज्य का दीवान बनाया। उन्होंने श्री अरविंदो घोष को भी बड़ौदा कॉलेज में नौकरी दी, जहां से उनके विचारों ने स्वतंत्रता आंदोलन को नई दिशा दी।

## १९११ का दिल्ली दरबार और अंग्रेजों को दिया संदेश


१९११ में दिल्ली में एक भव्य दरबार आयोजित हुआ, जहां ब्रिटेन के राजा जॉर्ज पंचम पहली बार भारत आए थे। सभी भारतीय राजाओं को आदेश दिया गया था कि वे राजा के सामने तीन बार झुकें और फिर पीछे हटते हुए जाएं। जब सयाजीराव की बारी आई, तो उन्होंने केवल एक बार औपचारिक झुकाव किया और फिर राजा की ओर पीठ करके चले गए। यह घटना ब्रिटिश अधिकारियों के लिए बहुत बड़ा झटका थी। कुछ प्रत्यक्षदर्शियों के अनुसार वह मुस्कुराते हुए वहां से चले गए। उस दिन अंग्रेजों को यह साफ संदेश मिल गया कि यह राजा उनकी सत्ता से डरने वालों में से नहीं है।

## विज्ञान, पानी और रेलवे का विकास

सयाजीराव ने केवल सामाजिक सुधार ही नहीं किए, बल्कि आधुनिक सुविधाओं का भी विस्तार किया। उन्होंने गायकवाड़ बड़ौदा स्टेट रेलवे का विस्तार किया, जो एशिया का सबसे बड़ा नैरो गेज रेलवे नेटवर्क बना। १८९२ में उन्होंने अजवा जल योजना शुरू की, जिसके जरिए वडोदरा शहर को गुरुत्वाकर्षण प्रणाली से पानी उपलब्ध कराया गया। आज भी शहर के बड़े हिस्से को उसी प्रणाली से पानी मिलता है।

## एक राजा जिसने भारत के भविष्य को आकार दिया

६३ वर्षों तक शासन करने के बाद ६ फरवरी १९३९ को महाराजा सयाजीराव गायकवाड़ का निधन हो गया। उनके शासनकाल ने यह साबित कर दिया कि एक दूरदर्शी राजा केवल अपने राज्य को नहीं बदलता, बल्कि आने वाली पीढ़ियों के भविष्य को भी दिशा देता है। सयाजीराव गायकवाड़ उन विरले भारतीय शासकों में से थे जिन्होंने सत्ता को केवल अधिकार नहीं माना, बल्कि उसे समाज के उत्थान का माध्यम बनाया। उनकी विरासत आज भी बड़ौदा के महलों, पुस्तकालयों, विश्वविद्यालयों और संस्थानों में जीवित है। लेकिन उससे भी ज्यादा, वह उस विचार में जीवित हैं कि अगर नेतृत्व में साहस और दूरदर्शिता हो, तो इतिहास की दिशा बदली जा सकती है।



# लग्नानंतर ७ वर्षांनी स्वप्नपूर्ती!

## सासू-सासऱ्यांनी कामातून दिली होती सुटी...

सक्सेस स्टोरी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

पती, सासू आणि सासरे यांच्या खंबीर पाठिंब्यामुळेच एका लहान मुलीची आई असूनही त्या हे उद्दिष्ट गाठू शकल्या. लग्न झाल्यानंतर महिला करिअरकडे तेवढे लक्ष देत नाहीत. अनेक जणी आपल्या संसारात रमतात. मुलेबाळे झाली की तेच आपलं विश्व समजतात. पण काही महिला संसार करून मुलेबाळे संभाळून आपली स्वप्नपूर्ती करतात. अशीच एक यशोगाथा समोर आली आहे. एका महिलेने लग्नाच्या सात वर्षांनंतर न्यायाधीश होण्याचे स्वप्न पूर्ण केले आहे. त्यात तिला तिच्या सासरच्या लोकांचा मोठा पाठिंबा मिळाला. त्यामुळे तिला या यशाला गवसणी घालता आली.

राजस्थानच्या बाडमेर जिल्ह्यातील जालीपा येथील रहिवासी असलेल्या दीपू कंवर यांनी गुजरात न्यायिक सेवेच्या परीक्षेत यश मिळविले आहे. त्यांनी राज्यात ७९ वा रँक मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.



लग्नानंतर कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे महिलांचे शिक्षण थांबते, असा समज मोडीत काढत दीपू यांनी हे यश मिळविले. विशेष म्हणजे त्यांच्या या प्रवासात सासरच्या मंडळींनी दिलेली प्रेरणा आणि खंबीर पाठिंबा अत्यंत महत्त्वाचा ठरला. त्यांच्या पाठिंब्यामुळे दीपू यांनी यशाला गवसणी घातली आहे.

२०१९ मध्ये लोकेंद्र सिंह यांच्याशी विवाह झाला होता. तेव्हा दीपू एलएलबीच्या द्वितीय वर्षात होत्या. पती आणि सासू-सासऱ्यांनी त्यांना केवळ शिकण्यासाठी प्रोत्साहनच दिले नाही, तर घरातील कामातून पूर्णपणे मुक्त ठेवले. दीपू सांगतात, की 'माझे सासरे अभ्यासाबाबत इतके गंभीर होते, की जर त्यांनी मला कधी घरकाम करताना पाहिले तर ते घरातील इतरांना ओरडत असत.' पहिल्या प्रयत्नात मुलाखतीपर्यंत पोहोचूनही अपयश आले. मात्र हार न मानता तिसऱ्या प्रयत्नात त्यांनी न्यायाधीशाची खुर्ची मिळवलीच.

दीपू यांना ५ वर्षांची मुलगी आहे. मातृत्वाची जबाबदारी आणि वकिलीचा सराव सांभाळत त्यांनी एलएलएम पूर्ण केले. घरच्या घरी अभ्यास करून हे यश खेचून आणले. पती लोकेंद्र सिंह यांनीच त्यांना न्यायाधीश होण्याचे स्वप्न दाखवले होते, जे दीपू यांनी प्रत्यक्षात उतरवले आहे. दीपू यांच्या मते ही यशोगाथा केवळ त्यांची नसून त्यांच्या संपूर्ण कुटुंबाची आहे. पती, सासू आणि सासरे यांच्या खंबीर पाठिंब्यामुळेच एका लहान मुलीची आई असूनही त्या हे उद्दिष्ट गाठू शकल्या.

त्या सांगतात की "मुलींनी लग्नानंतरही आपली स्वप्ने सोडू नयेत," असा संदेश त्यांनी या यशातून दिला आहे. पती लोकेंद्र सिंह स्वतः जयपूरमधून एलएलबी करत आहेत. त्यांनीच दीपू यांना या क्षेत्राची वाट दाखवली. सासरच्यांनी मुलीप्रमाणे माया दिल्यामुळेच आज एका ग्रामीण भागातील सून न्यायाधीशाच्या खुर्चीवर विराजमान होणार आहे. त्यांनी लग्नाच्या साता वर्षानंतर आपले स्वप्न पूर्ण केले आहे. त्यांच्या या यशाचे सर्वत्र कौतूक होत आहे.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर  चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम  क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# पापमोचणी एकादशी विशेष

# आत्मशुद्धी आणि भक्तीचा पवित्र दिवस

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात एकादशीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. वर्षभरात येणाऱ्या २४ एकादशींपैकी पापमोचणी एकादशी ही एक अत्यंत पुण्यदायी आणि पापांचा नाश करणारी एकादशी मानली जाते. चैत्र महिन्याच्या कृष्ण पक्षातील एकादशीला पापमोचणी एकादशी येते. 'पाप' म्हणजे पाप किंवा चुकीची कृत्ये आणि 'मोचणी' म्हणजे मुक्ती देणारी. त्यामुळे या दिवशी केलेल्या उपवास, जप, तप आणि पूजेमुळे मनुष्याला पापांपासून मुक्ती मिळते, अशी श्रद्धा आहे.

### पापमोचणी एकादशीचे धार्मिक महत्त्व

पुराणांनुसार या एकादशीचे वर्णन विशेषतः पद्मपुराण आणि भविष्योत्तर पुराणामध्ये आढळते. या दिवशी भगवान विष्णूची भक्तिभावाने पूजा केल्यास मनुष्याच्या सर्व पापांचे क्षालन होते आणि त्याला आध्यात्मिक शांती लाभते. धर्मग्रंथांमध्ये सांगितले आहे, की अज्ञानाने किंवा परिस्थितीमुळे झालेल्या पापांपासून मुक्त होण्यासाठी पापमोचणी एकादशीचे व्रत अत्यंत प्रभावी मानले जाते. या दिवशी उपवास केल्याने मन, शरीर आणि आत्मा शुद्ध होतात तसेच जीवनात सकारात्मकतेचा अनुभव येतो.

### पौराणिक कथा

पापमोचणी एकादशीशी संबंधित एक प्रसिद्ध कथा पद्मपुराणात वर्णन केलेली आहे. प्राचीन काळी मेधावी नावाचे एक ऋषी कठोर तपश्चर्या करत होते. त्या काळात स्वर्गातील अप्सरा मंजुघोषा



हिने आपल्या सौंदर्याने आणि संगीताने त्यांचे तप भंग केले. काही काळानंतर ऋषींना आपल्या तपभंगाची जाणीव झाली आणि त्यांनी क्रोधाने मंजुघोषेला शाप दिला. त्यानंतर अप्सरेने पश्चात्ताप करून ऋषींना शापमुक्तीचा उपाय विचारला. तेव्हा ऋषींनी तिला चैत्र कृष्ण एकादशीचे व्रत करण्यास सांगितले. मंजुघोषाने श्रद्धेने पापमोचणी एकादशीचे व्रत केले आणि तिचे सर्व पाप नष्ट होऊन तिला शापमुक्ती मिळाली. त्यामुळे या एकादशीला 'पापमोचणी' असे नाव पडले.

### व्रत आणि पूजेची पद्धत

– पापमोचणी एकादशीच्या दिवशी भक्तांनी सकाळी लवकर उठून स्नान करून स्वच्छ वस्त्रे परिधान करावीत. त्यानंतर घरातील देवस्थानात भगवान विष्णूची प्रतिमा किंवा मूर्ती समोर ठेवून पूजा करावी.
– भगवान विष्णूंना फुले, तुळशीपत्र, धूप, दीप अर्पण करावे.
– विष्णुसहस्रनाम, भगवद्गीता किंवा हरिनामाचा जप करावा.
– दिवसभर उपवास करून संध्याकाळी आरती करावी.
– दुसऱ्या दिवशी द्वादशीला व्रत पारण करून गरजूंना अन्नदान किंवा दानधर्म करावा.
– उपवासाच्या दिवशी सात्त्विक आहार घ्यावा किंवा काहीजण निर्जळ उपवासही करतात. मात्र उपवासाचा खरा अर्थ मन, वाणी आणि कर्म यांची शुद्धी ठेवणे असा आहे.

### आध्यात्मिक आणि सामाजिक संदेश

पापमोचणी एकादशीचा मुख्य संदेश म्हणजे आत्मपरीक्षण आणि आत्मशुद्धी. जीवनात कधी नकळत किंवा भावनेच्या भरात चुकीची कृत्ये घडतात. या दिवसाच्या निमित्ताने मनुष्याने आपल्या चुका मान्य करून चांगल्या मार्गावर चालण्याचा संकल्प करावा. तसेच या दिवशी दान, सेवा आणि गरजूंची मदत करण्याचेही महत्त्व सांगितले जाते. यामुळे समाजात परस्पर सहकार्य, करुणा आणि मानवतेची भावना वाढीस लागते. पापमोचणी एकादशी हा केवळ धार्मिक विधींचा दिवस नसून आत्मशुद्धी, सदाचार आणि भक्ती यांचे महत्त्व सांगणारा पवित्र दिवस आहे. श्रद्धा, संयम आणि सकारात्मक विचार यांच्या साहाय्याने मनुष्य आपले जीवन अधिक शुद्ध आणि अर्थपूर्ण बनवू शकतो. त्यामुळे या दिवशी उपवास, प्रार्थना आणि सत्कर्म यांद्वारे आध्यात्मिक उन्नती साधण्याचा प्रयत्न करणे हेच या एकादशीचे खरे महत्त्व आहे.

## पैठणच्या नाथ महाराज मंदिरातील 'विजयी पांडुरंग'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



पैठण गावात जे एकनाथ महाराजांचे मंदिर आहे त्यांच्या देवघरात सर्वांत वर तुळशी माळ घातलेली पांडुरंगाची मूर्ती आहे. ती सदैव फुल्ल वस्त्रालंकाराने झाकलेली असते. त्यामुळे मूर्तीचे फक्त मुखकमल दर्शन होत असते.

वास्तविक या मूर्तीचे एक वेगळे वैशिष्ट्य आहे. आपण सहसा पांडुरंगाची मूर्ती दोन्ही हात कमरेवर ठेवून उभा असलेला पांडुरंग पाहतो. पण या मूर्तीत पांडुरंगाचा डावा हात कमरेवर आहे, तर उजवा हात कमरेच्या खाली आहे. मात्र, समोरच्या बाजूला उघडणारा तळवा किंवा तळहात दिसतो. म्हणून त्या मूर्तीला 'विजयी पांडुरंग' असे म्हणतात. हा विजयी पांडुरंग कसा? याची एक सुंदर आख्यायिका आहे. हा भगवंत एकनाथांना प्रासादिक रूपाने मिळालेला आहे. ही मूर्ती दीड फूट उंचीची आणि अडीच किलो वजनाची पंचधातूंपासून बनविलेली आहे. कर्नाटकातील राजा रामदेवराय हा पंढरपूरच्या पांडुरंगाचा उपासक होता. त्यामुळे याने मंदिर बांधले आणि सोनारकरवी पंचधातूंची मूर्ती बनवून घेतली आणि त्याची प्राणप्रतिष्ठा करणार तोच पांडुरंग दृष्टांत देऊन त्यांना म्हणाले, की "माझी ही मूर्ती तू येथे स्थापलीस तर मी येथे राहणार नाही आणि माझ्या इच्छेविरुद्ध तू तसे केले तर तुझा निर्वंश होईल. मग राजाने विचारले, की या मूर्तीचे काय करू. तेव्हा पांडुरंग म्हणाला, की पैठणच्या नाथ महाराजांना नेऊन दे. त्यानंतर राजाने ती मूर्ती वाजतगाजत पैठणला आणली. तेव्हा नाथ महाराज मंदिरात असलेल्या खांबाला टेकून प्रवचन सांगत होते. ते ज्या खांबाला टेकून पुराण सांगायचे त्या खांबाला 'पुराण खांब' असे म्हणतात.

राजा रामदेवराय नाथांचे प्रवचन संपेपर्यंत थांबले आणि त्यांनी ही मूर्ती तुमच्याकडे कशी किंवा का आणली हे सर्व नाथांना सांगितले. त्यामुळे भगवंतांना तुमच्याकडे ठेवून घ्या, असे सांगितले. त्यावर नाथांनी मूर्तीला नमस्कार केला आणि म्हणाले, की तू राजाच्या घरी राहणारा आहेस. माझ्याकडे तुझी राहायची इच्छा आहे पण राजासारखे पंचपक्वान्न माझ्याकडे तुला मिळणार नाहीत, तेव्हा या भगवंताच्या पायाखालच्या विटेवर अक्षरे उमटली 'दास जेवू घाला न.. घाला' म्हणजे हे नाथ महाराज मी तुझ्याकडे दास म्हणून आलोय तू जेवायला दे अथवा न दे मी तुझ्याजवळ राहणार आहे. हेही या मूर्तीचे एक वैशिष्ट्य सांगता येते, की विटेवर अजूनही ही उमटलेली अक्षरे आहेत. प्रत्यक्ष भगवंत घरी आले म्हणल्यावर पूर्वी पाहुणचार म्हणून कोणी बाहेरून आले की गूळ पाणी दिले जायचे पण प्रत्यक्ष भगवंत आलेत म्हणल्यावर त्यांनी आपल्या पत्नीला आवाज दिला त्यांचे नाव गिरीजाबाई होते. त्यांचा पाहुणचार म्हणून बाईंनी चांदीच्या वाटीत लोणी आणि खडीसाखर आणले नि नाथांसमोर धरले हे लोणी घेण्यासाठी म्हणून भगवंतांनी आपला उजवा हात कमरेवरचा काढून पुढे केला नि लोणी चाटले नंतर तो हात लोणचट म्हणजेच थोडा लोणी लागलेला असल्याने परत कमरेवर ठेवताना हात व्यवस्थित कमरेवर ठेवला नाही म्हणून त्या मूर्तीचा हात असा आहे आणि या मूर्तीच दुसरे वैशिष्ट्य असे आहे, की आजही प्रत्येक एकादशीला अभिषेकासाठी मूर्ती खाली घेतली जाते तेव्हा संपूर्ण अभिषेकानंतर मूर्तीला पिढीसाखरेने स्वच्छ पुसले जाते तेव्हा हाताला ही पुसले जाते तेव्हा त्या हातावरून हात फिरवला तर आजही लोण्याचा चिकटपणा जाणवतो, की याच भगवंतांनी नाथांच्या घरी कावडीने पाणी वाहिले. मूर्तीच्या खांद्यावर पाणी वाहिल्याचे घट्टे आजही दिसतात. अशा तीन वैशिष्ट्यांनी नटलेली ही विजयी पांडुरंगाची मूर्ती आहे.

## सूर्य देवांचे दयाळू आणि रक्षक रूप : कृपा आणि दीननाथ स्वरूप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात सूर्यदेवाला केवळ एक ग्रह नाही, तर प्रत्यक्ष देवता म्हणून पूजले जाते. ते जीवन, ऊर्जा आणि प्रकाशाचे स्रोत आहेत. परंतु त्यांच्या अनेक रूपांमध्ये, त्यांचे दयाळू (कृपा) आणि दीननाथ (दीन–दुःखी लोकांचे नाथ/रक्षक) स्वरूप विशेष महत्त्व ठेवते. सूर्य देव आपल्या किरणांनी केवळ पृथ्वीला जीवनच देत नाहीत, तर ते अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश पसरवतात, रोगांचा नाश करतात आणि गरजू लोकांवर आपली असीम कृपा करतात. त्यांचे हे स्वरूप आपल्याला शिकवते की प्रकाश, ऊर्जा आणि करुणेने आपण स्वतःचे आणि इतरांचे जीवन कसे प्रकाशित करू शकतो. हा लेख सूर्यदेवांच्या याच कृपा आणि दीननाथ स्वरूपावर केंद्रित आहे.



### सूर्यदेवांच्या दयाळू आणि रक्षक रूपाचे १० प्रमुख मुद्दे

जीवन आणि पोषणाचा स्रोत : सूर्यदेव समस्त जीवसृष्टीचे प्राणदाता आहेत. त्यांच्या किरणे वनस्पतींना अन्न तयार करण्यास मदत करतात. ज्यामुळे जीवनचक्र चालते. ते पृथ्वीला उष्णता आणि प्रकाश देऊन सर्व प्राण्यांचे पोषण करतात.

**उदाहरण :** सूर्याशिवाय पृथ्वीवर जीवन शक्य होणार नाही. ते पिके पिकवतात आणि आपल्याला व्हिटॅमिन डी देतात, जे हाडांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे.

**रोगांचे नाशक (आरोग्य प्रदाता) :** सूर्यदेवाला आरोग्याचे देवता म्हणूनही पूजले जाते. असे मानले जाते की सूर्याच्या किरणांमध्ये अनेक रोगांना बरे करण्याची क्षमता असते आणि त्यांच्या नियमित पूजेने व्यक्ती निरोगी राहतो.

**उदाहरण :** सकाळच्या सूर्याच्या किरणांमुळे शरीरात व्हिटॅमिन डीचे उत्पादन वाढते, जे रोगप्रतिकारशक्ती मजबूत करते आणि नैराश्य कमी करण्यास मदत करते. अज्ञानाच्या अंधाराचे नाशक **(ज्ञान प्रदाता) :** सूर्य अंधार दूर करून प्रकाश पसरवतात, जो ज्ञानाचे प्रतीक आहे. ते अज्ञान आणि नकारात्मक विचार दूर करून व्यक्तीला योग्य मार्ग दाखवतात आणि बुद्धी प्रदान करतात.

**उदाहरण :** 'तमसो मा ज्योतिर्गमय' हे तत्त्व सूर्याच्या प्रकाशाला ज्ञानाशी जोडते, जे आपल्या जीवनातून अज्ञानाचा अंधार दूर करते.

**दीन–दुःखी लोकांचे नाथ (दीनबंधू) :** सूर्यदेवाला दीननाथ किंवा दीनबंधू असेही म्हटले जाते, ज्याचा अर्थ गरीब आणि दुःखी लोकांचे रक्षक आणि मित्र. ते कोणत्याही भेदभावाशिवाय सर्वांवर आपली कृपा करतात.

**उदाहरण :** सूर्याचा प्रकाश श्रीमंत आणि गरीब, सर्वांवर समान रीतीने पडतो, जे त्यांची निष्पक्षता आणि सार्वत्रिक कृपेचे प्रतीक आहे.

**शक्ती आणि उर्जेचे प्रतीक :** सूर्यदेव समस्त ब्रह्मांडात शक्ती आणि उर्जेचे सर्वांत मोठे स्रोत आहेत. त्यांच्या पूजेने व्यक्तीमध्ये आत्मविश्वास, धैर्य आणि जीवनशक्ती वाढते.

**उदाहरण :** प्राचीन काळापासून योद्धे आणि राजे शक्ती प्राप्त करण्यासाठी सूर्याची उपासना करत आले आहेत.

**संकटमोचक आणि रक्षक :** संकटाच्या वेळी सूर्यदेवाची पूजा केल्याने ते भक्तांना सर्व अडथळे आणि धोक्यांपासून वाचवतात. त्यांना सर्व नकारात्मक शक्तींचा आणि शत्रूंचा नाश करणारा मानले जाते.

**उदाहरण :** हनुमानजींना सूर्याचा शिष्य मानले जाते आणि सूर्याच्या आशीर्वादानेच ते संकटमोचक झाले.

**नवग्रहांमध्ये प्रमुख स्थान :** ज्योतिषशास्त्रात सूर्याला नवग्रहांचा राजा मानले जाते. त्यांची शुभ स्थिती कुंडलीत व्यक्तीला मान–सन्मान, पद–प्रतिष्ठा आणि यश मिळवून देते.

**उदाहरण :** जर कोणाच्या कुंडलीत सूर्य कमजोर असेल, तर आदित्य हृदय स्तोत्राचे पठण करण्याची शिफारस केली जाते.

सात्त्विकता आणि शुद्धीचे कारक : सूर्याची किरणे शुद्धता आणि सात्त्विकतेचे प्रतीक आहेत. त्या वातावरणाला शुद्ध करतात आणि नकारात्मक ऊर्जा दूर करतात.

**उदाहरण :** सकाळी सूर्य नमस्कार करणे किंवा सूर्याला अर्घ्य देणे शरीर आणि मन दोन्ही शुद्ध करते.

**नियमितता आणि शिस्तीचा संदेश :** सूर्यदेव दररोज निश्चित वेळेवर उगवतात आणि मावळतात, जे आपल्याला जीवनात नियमितता आणि शिस्तीचा संदेश देतात.

**उदाहरण :** ते आपल्याला शिकवतात की निरंतर प्रयत्नाने आणि नियमिततेनेच यश मिळते.

विश्वव्यापी आराध्य : सूर्यदेवाची पूजा केवळ हिंदू धर्मापुरतीच मर्यादित नाही, तर जगातील अनेक प्राचीन संस्कृतींमध्येही सूर्याला देवता म्हणून पूजले जात आहे.

**उदाहरण :** इजिप्तचे रा, ग्रीकचे हेलिओस आणि जपानची देवी अमातेरासू हे सर्व सूर्यदेवतेची विविध रूपे आहेत.

## मना सज्जना...

## "सत्य सांडू नको रे"

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सद्गुरु समर्थ स्मरण आणि प्रभु रामचंद्र यांना वंदन. आज श्लोक क्रमांक २० मध्ये समर्थ काय बजावताहेत मनाला ते बघूया......

**श्लोक –**

**मना सर्वथा सत्य सांडू नको रे ।**
**मना सर्वथा मिथ्य मांडू नको रे ।**
**मना सत्य ते सत्य वाचे वदावे ।**
**मना मिथ्य ते मिथ्य सोडूनी द्यावे ॥१९॥**


समर्थ मनाला हळुवार गोंजारत योग्य मार्गावर आणण्याचा प्रयत्न करताहेत. ते चिडत नाहीत. रागवत नाहीत. ते स्वतः मनाचा होणारा गोंधळ जाणून आहेत. मनाच्या सर्व वृत्ती त्यांना चांगल्याच अवगत आहेत. एखाद्या वाकलेल्या नाजूक फांदीला सरळ करायचे म्हणजे काळजीपूर्वक किंचित दाब द्यावा लागतो. अगदी तसेच त्यांचे सांगणे आहे. आर्जवी भाषेत ते मनाला बजावतात.

या श्लोकातील "सत्य" म्हणजे नेमके काय? ते समजून घेऊया. आपल्या आजूबाजूला असलेल्या दृश्य जगाचे ज्ञान आपल्याला आपल्या ज्ञानेंद्रियांच्या मार्फत होते. ते आपल्या मनात नोंदवले जाते. त्यावरची साधक बाधक टिपणी आपले मन तयार करते. परंतु तेच "सत्य" असते का? तर नाही !

जरी दृष्टीला पटले, दिसले असले तरी, जे आत्मप्रचिती ला जाणवले तेच "सत्य," असे समर्थांना अभिप्रेत असावे. सत्य हे त्रिकालाबाधित असते म्हणून समर्थ म्हणतात,

**"सत्य सांडू नको रे"**

सत्याची बाजू नेटाने आणि धैर्याने धरून ठेवायची असते. प्रसंगी सत्य कटू असते, त्याने हात पोळतात. परंतु शेवटी सत्य हे सत्य असते. त्यामुळे परिस्थिती पाहून अथवा विकारवश होऊन सत्याची संगती सोडू नये.



हा श्लोक वरवर अत्यंत साधा वाटतो; पण त्यात जीवनाचे मोठे तत्त्वज्ञान दडलेले आहे. "सत्य" आणि "मिथ्य" संदर्भात समर्थ मनाला अवघ्या चार साध्या ओळींत मोठा धडा देतात.

"**मना सर्वथा सत्य सांडू नको रे**"

सत्य म्हणजे प्रखर सूर्याप्रमाणे आहे. ढग त्याला काही काळ झाकू शकतात, पण नष्ट करू शकत नाहीत. सत्याला कधी कधी कठिण परीक्षा द्यावी लागते. वाट पाहावी लागते; पण शेवटी त्याचाच विजय होतो. याच्या उलट मिथ्य म्हणजे निव्वळ काजव्याचा प्रकाश. आभास. क्षणभर चमकतो, पण त्यात स्थैर्य नसते. थोड्या वेळाने अंधार पुन्हा पसरतो.

तुकोबांनी एका अभंगात म्हटले आहे,

**तोवरि तोवरि शोभतील गारा ।**
**जव नाही हिरा प्रकाशला ॥**
**तोवरि तोवरि शोभतील दीपिका ।**
**नुगवता एका भास्करासी ॥**

इथे गारा म्हणजे चमकदार खडा.तो चटकन आपले लक्ष वेधून घेतो. त्याचे आकर्षण वाटते. त्याचे मोल ही फारसे नसते म्हणुन जास्तच हवा हवासा वाटतो. परंतु जसा एखादा स्व–तेजाने तळपणारा हिरा त्याच्या समोर येतो तसे खड्याचे खरे रूप उघड होते. तसेच अंधारातच दिव्यांच्या माला शोभून दिसतात. सूर्योदय झाला की त्यांचे महत्व संपुष्टात येते. मिथ्यही असेच असते. ते आकर्षक रुपडे घेऊन आपल्या समोर येते. मन त्याला भुलते. प्रत्यक्षात सत्याच्या पुढे त्याचा निभाव लागत नाही.

**समर्थ म्हणतात**

मनाने सत्य सोडू नये आणि असत्याची मांडणीही करू नये. कारण मिथ्याला आधार द्यायचा म्हणजे वाळूवर घर बांधण्यासारखे आहे. सुरुवातीला ते सुंदर दिसते; पण एक लाट आली की ते कोसळते.

जीवनात अनेकदा असे प्रसंग येतात की सत्य सांगणे कठीण वाटते. तेव्हा मन मिथ्याचा आधार घ्यायला प्रवृत्त होते. पण लक्षात ठेवावे सत्याला धैर्य लागते, मिथ्याला सबबी लागतात.

म्हणून समर्थ मनाला सांगतात

जर काही बोलायचेच असेल तर सत्य ते सत्यच बोला, आणि जे मिथ्य आहे ते निर्भयपणे, निः संकोचपणे सोडून द्या.

कारण शेवटी मनाची शांती, विश्वास आणि आत्मिक समाधान यांची इमारत सत्याच्या पायावर उभी असते.

बऱ्याचदा आपण वास्तविक स्थिती पासून पळ काढण्याच्या उद्देशाने कुठे काहीतरी निरुपद्रवी खोटे बोलत असतो. त्यामुळे तत्कालीक समाधान मिळते, वेळ मारून नेली जाते परंतु, पुढे त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतातच.

आजच्या आभासी जगात तर मिथ्य मांडण्याची चढाओढ सुरू आहे. आपल्या जगाशी दुरान्वये सम्बन्ध नसलेल्या घटना, त्यांची शहानिशा न करता केवळ हाती असलेल्या तंत्रज्ञानाचा गैरवापर करुन आपण पुढे प्रसारित करीत राहतो. त्यातली उत्तेजना तात्कालिक असते. मौज वाटते. परंतु त्यातून घातक अफवा जन्माला येतात. त्याचे परीणाम समाजाला भोगावे लागतात.

म्हणून समर्थ म्हणतात,,,,,

**बरे सत्य बोला यथातथ्य चाला ।**
**बहू मानिती लोक येणे तुम्हाला ।**

एक सुभाषित प्रसिद्ध आहे.

**"सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात्**
**न ब्रूयात् सत्यमप्रियम् ।**
**प्रियं च नानृतं ब्रूयात्**
**एष धर्मः सनातनः ॥"**

सत्य बोलावे, प्रिय बोलावे, सत्य असले तरी अप्रिय बोलू नये.
प्रिय असले तरी असत्य (मिथ्य)बोलू नये;
हाच सनातन धर्म आहे. हेच शाश्वत धर्माचे सत्य स्वरुप आहे.
हे सुभाषित मनाने आचरणात आणले की,मनाचा प्रवास हा "जाणता" होण्याकडे होतो.

**सत्य मिथ्या कळो आले ।**
**"जाणता" त्यास बोलिजे ।**

एकदा सत्य– मिथ्य कळू लागले की, माणसाचा प्रवास "जाणता" होण्याकडे होऊ लागतो.

**जय जय रघुवीर समर्थ!**

**– भाऊसाहेब देशमुख,**
**९४२०८९५४१**

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)